# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.01.2026** **वारःशनिवार**

---

1. नवी दिल्लीतील राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात पवित्र पिपरहवा अवशेषांच्या भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार उद्घाटन
2. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी महाराष्ट्रातील दुसऱ्या बोगद्याचं खोदकाम पूर्णत्वास
3. महाराष्ट्रातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी आज निवडणूक चिन्हांचं वाटप झाल्यानंतर अंतिम उमेदवार यादी होणार जाहीर आणि
4. 19 वर्षांखालील पुरुष क्रिकेटमध्ये, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील 50 षटकांच्या सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज विलोमूर पार्क इथं

**<u>पंतप्रधान-नवी दिल्ली</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात, भगवान बुद्धांशी संबंधित, पवित्र पिपरहवा अवशेषांच्या, भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन करतील. इतिहास, संस्कृती आणि भगवान बुद्धांच्या आदर्शांबद्दल प्रेम असलेल्यांसाठी आजचा दिवस खूप खास असल्याचा उल्लेख समाज माध्यमावरील पोस्ट मध्ये पंतप्रधानांनी केला आहे. शतकाहून अधिक काळानंतर परत आणलेले पिपरहवा अवशेष आणि राष्ट्रीय संग्रहालय नवी दिल्ली तसंच भारतीय संग्रहालय कोलकाता, यांच्या संग्रहात जतन केलेले, पिपरहवा इथले, अस्सल अवशेष आणि पुरातत्वीय साहित्य, या प्रदर्शनात एकत्र आणले असल्याचं, मोदींनी म्हटलं आहे. हे प्रदर्शन भगवान बुद्धांच्या उदात्त विचारांना अधिक लोकांपर्यंत पोचवण्याच्या, सरकारच्या वचनबद्धतेशी सुसंगत असल्याचं सांगून, ते म्हणाले की, देशातील तरुणाई आणि त्याच्या समृद्ध संस्कृतीमधील बंध, आणखी दृढ करण्याचा हा एक प्रयत्न आहे. हे अवशेष परत आणण्यात योगदान देणाऱ्या प्रत्येकाचं त्यांनी कौतुक केलं.

**<u>बुलेट ट्रेन</u>**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी महाराष्ट्रातील दुसऱ्या बोगद्याचं खोदकाम पूर्ण झालं असून, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या दूरस्थ उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. पालघर जिल्ह्यातला दीड किलोमीटर लांबीचा हा बोगदा विरार ते बोईसर स्थानकांदरम्यान आहे. पहिला बोगदा ठाणे ते बीकेसी दरम्यान असून तो 5 किलोमीटर लांबीचा आहे. 508 किलोमीटर लांबीच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचा पहिला टप्पा, पुढील वर्षी 15 ऑगस्टला सुरु होण्याची अपेक्षा आहे.

**<u>प्रगतीमंच</u>**

सक्रिय प्रशासन आणि वेळेवर अंमलबजावणीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येणाऱ्या प्रगती या प्रणालीमुळं, प्रकल्प आणि प्रमुख कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीला गती मिळाल्याचं, मंत्रीमंडळ सचिव टी. व्ही सोमनाथन यांनी म्हटलं आहे. दिल्लीत काल वार्ताहर परिषदेत बोलताना त्यांनी प्रगती प्रणालीच्या प्रत्यक्ष परिणामांविषयी माहिती दिली. प्रगती च्या आत्तापर्यंत झालेल्या 50 बैठकांतून, समस्याग्रस्त प्रकल्पांसह, 85 लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या, तीन हजार तीनशेहून अधिक प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. या व्यतिरिक्त 'वन नेशन वन रेशन कार्ड' आणि 'पीएम जन आरोग्य योजना' यासह 61 सरकारी योजनांचाही आढावा घेण्यात आल्याचं सचिवांनी सांगितलं. 2015 मध्ये 'प्रगती' लागू झाल्यापासून, कोरोना, बँकिंग आणि विमा, तसंच जन धन योजनेशी संबंधित समस्यांसह 36 वेगवेगळ्या प्रकारच्या तक्रारींचा आढावा, बैठकीत घेण्यात आल्याची माहिती सोमनाथन यांनी वार्ताहरांना दिली.

**शिवराजसिंह चौहान-नाशिक**

सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्यासाठी, उत्पादनाचं प्रमाणीकरण करणारी स्वतंत्र आणि विश्वासार्ह यंत्रणा उभारण्यात येणार असल्याची माहिती, केंद्रीय कृषी आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली. महाराष्ट्रातील नाशिकमधील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत, कृषी विज्ञान केंद्र इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. बदलणाऱ्या हवामानामुळं आणि नैसर्गिक आपत्तीमुळं, शेतकऱ्यांना मोठं आर्थिक नुकसान सहन करावं लागतं, त्यामुळं शाश्वत आर्थिक उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीनं, शेतीला पूरक व्यवसायाची जोड देण्यासाठी, शेतकऱ्यांसाठी एकात्मिक शेती पद्धती आवश्यक असल्याचंही, चौहान यांनी सांगितलं.

**मध्यप्रदेश-दूषित पाणी**

मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी, इंदूरमधील पिण्याच्या दूषित पाण्याच्या घटनेबाबत, राज्य सरकारी अधिकाऱ्यांनी उचललेल्या पावलांचा आढावा घेतला आहे. मुख्यमंत्र्यांनी इंदूर महानगरपालिका आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांना, कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत. त्यांनी इंदूरमधील अतिरिक्त आयुक्तांची तात्काळ बदली करण्याचे आणि प्रभारी अधीक्षक अभियंत्याकडून पाणी वितरण कामांचा कार्यभार काढून घेण्याचे निर्देश दिले आहेत. इंदूरमधील घटनेनंतर, राज्याच्या इतर भागांसाठी देखील सुधारणात्मक उपाययोजनांसाठी संबंधित अधिकाऱ्यांना कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, राज्य सरकारनं या घटनेसंदर्भात मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या, इंदूर खंडपीठासमोर, स्थिती अहवाल सादर केला. या महिन्याच्या 6 तारखेला त्यावर न्यायालयात सविस्तर सुनावणी होणार आहे.

**अर्जमागे**

महाराष्ट्रातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत काल संपली. आज निवडणूक चिन्हांचं वाटप झाल्यानंतर, अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे. येत्या 15 जानेवारीला मतदान, तर 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे. काल अनेक प्रभागांमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले, तर अनेक ठिकाणी बंडखोरी कायम राहिली आहे. सर्वच राजकीय पक्षात बंडखोरी झाली असून त्याचा फटका बसू नये म्हणून, अर्ज मागं घेण्यासाठी बंडखोरांची समजूत काढल्यानंतर, बंडखोरांनी अर्ज मागे घेतले. परिणामी काही उमेदवार बिनविरोध निवडले गेले.

**पश्चिमबंगाल-बनावट-मतदार**

पश्चिम बंगाल मध्ये मतदार यादीत बनावट किंवा अस्तित्वात नसलेल्या मतदारांची नावं, बेकायदेशीरपणे समाविष्ट केल्याचा आरोप असलेल्या, पाच निलंबित राज्य अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचे निर्देश, निवडणूक आयोगानं संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहेत. राज्य मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बरुईपूर पूर्व, तसंच मोयना विधानसभा मतदारसंघातील निवडणूक नोंदणी अधिकारी, देवोत्तम दत्ता चौधरी, बिप्लब सरकार आणि सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी, तथागत मंडल, सुदिप्ता दास तसंच डेटा एंट्री ऑपरेटर सुरजित हलदर, यांच्याविरुद्ध फौजदारी खटले दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**वस्त्रोद्योग प्रोत्साहन**

सरकारनं वस्त्रोद्योग उद्योगांसाठीच्या उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेअंतर्गत, नवीन अर्ज सादर करण्याची मुदत, 31 मार्चपर्यंत वाढवली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये पोर्टल पुन्हा सुरू केल्यानंतर, उल्लेखनीय प्रतिसादामुळं तसंच वस्त्रोद्योग कंपन्यांकडून अद्यापही प्रस्ताव सादर केले जात असल्यानं ही मुदतवाढ देण्यात आली आहे. भारतातील वस्त्रोद्योग क्षेत्रावरील गुंतवणुकदारांचा वाढता विश्वास, यामधून अधोरेखित होत असल्याचं वस्त्रोद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे.

**साहित्य संमेकन-सातारा**

99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन काल ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते महाराष्ट्रातील सातारा इथं झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळत्या अध्यक्षा डॉक्टर तारा भवाळकर,

संमेलनाचे अध्यक्ष- ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील, स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

**पिफ**

भारतीय चित्रपट सृष्टीतील योगदानाबद्दल ज्येष्ठ अभिनेते बिस्वजित चॅटर्जी, ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे आणि फरीदा जलाल यांना पीफ डिस्टींग्वीश्ड पुरस्कार, तर ज्येष्ठ व्हायोलिन वादक आणि संगीतकार अमर हलदीपूर यांना संगीत क्षेत्रातील योगदानासाठी, संगीतकार एस. डी. बर्मन आंतरराष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचं, पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष आणि संचालक डॉक्टर जब्बार पटेल यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत जाहीर केलं. 24 वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यंदा 15 ते 22 जानेवारी या कालावधीत होणार आहे. मराठी चित्रपट स्पर्धा विभागात 'तिघी' या चित्रपटाची अधिकृत निवड झाली आहे.

**ऊस उत्पादन**

देशात यंदा सुमारे साडेतीनशे लाख टन साखरेचं उत्पादन होण्याचा अंदाज असून 31 डिसेंबरअखेर 118 लाख टन साखर तयार झाली आहे. त्यात महाराष्ट्रात सर्वाधिक सुमारे 49 लाख टन आणि त्यानंतर उत्तर प्रदेशात 35 लाख टन साखर तयार झाली आहे. देशात आतापर्यंत झालेलं साखर उत्पादन समाधानकारक असून यापुढील काळात त्यात आणखी वाढ होईल अशी माहिती राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील पुरुष क्रिकेटमध्ये, भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील 50 षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना भारतीय वेळेनुसार आज दुपारी दीड वाजता बेनोनी इथल्या विलोमूर पार्क इथं खेळला जाणार आहे. 15 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या आयसीसी 19 वर्षांखालील विश्वचषकाच्या पूर्वतयारी साठी ही मालिका दोन्ही संघांसाठी उपयुक्त ठरेल. आयुष म्हात्रे मनगटाच्या दुखापतीमुळं मालिकेला मुकणार असल्यानं वैभव सूर्यवंशी या मालिकेत भारताचं नेतृत्व करेल. तर दक्षिण आफ्रिकेचं नेतृत्व मुहम्मद बुलबुलिया करत आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज दिल्ली, हरियाणा, पंजाब आणि चंदीगडमध्ये खूप दाट धुक्याच्या स्थितीचा इशारा जारी केला आहे. हवामान विभागानं हिमाचल प्रदेशातील काही ठिकाणी शीतलहरीची स्थिती तसंच उत्तराखंडमध्ये दवाची शक्यता वर्तवली आहे. सोमवारपर्यंत पूर्व उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश आणि बिहारमधील काही ठिकाणी थंडीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार